## प्रेस नोट

## हॉटेल ग्रीन व्हीला, कोरेगाव पार्क, पुणे येथील हुक्का पार्लरवर पोलीसांचा छापा, मालक व मॅनेजरवर गुन्हा दाखल

कोरेगाव पार्क पो.स्टे.चे कार्यक्षेत्रात कोरेगाव पार्क, नॉर्थ मेन रोडवर हॉटेल दि ग्रीन व्हीला हे हॉटेल आहे. सदर हॉटेलमध्ये हॉटेलचे मालक हमजा रंगूनी व मॅनेजर अमोलचंद धुपे हे तरूण तरूणींना हुक्का ओढण्यास देतात. हुक्का ओढण्यासाठी ज्वालाग्रही पेटते कोळसे पुरवितात. त्यामुळे जीवीतहानी होण्याचा शक्यता आहे. अशी बातमी कोरेगाव पार्क पो.स्टे. ला माहिती मिळाली.

नमूद बातमीवरून मा.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, निखील पवार, पोलीस उप निरीक्षक व कोरेगाव पार्क पो.स्टे. कडील स्टाफने दि.३१/०८/२०१८ रोजी रात्रौ २१.०० वा. नमूद हॉटेलवर छापा घातला असता सदर हॉटेलमध्ये एकूण २३ तरूण तरूणी हुक्का स्पॉट व पाईपचे साहाय्याने हुक्का ओढत असताना दिसले. सदर हॉटेलचे पाहणीमध्ये हॉटेल मालक हमजा शफिक रंगूनी, वय ३२, रा.बी १, फ्लॅट नं.१३, ब्रम्हा आंगण सोसायटी, साळुंके विहार रोड, कोंढवा, पुणे व मॅनेजर अमोलचंद शामराव धुपे, वय ३२ वर्षे, रा.स.नं.४२, गाडगे महाराज वसाहत, कोरेगाव पार्क, पुणे यांनी संगनमत करून आपले पत्र्याचे शेडचे हॉटेलमध्ये ग्राहकांना बेकायदेशीर, बिगर परवाना हुक्का ओढण्यासाठी हुक्का फ्लेव्हर व त्याचे साहित्य कामगारांकरवी पुरवून लोखंडी शेगडीमध्ये कोळसा पेटवून शेगडीमधील पेटता निखारा हा हॉटेलमधील कामगार हयगयीने व बेदरकारपणे पुरेशी काळजी न घेता ग्राहकांना हुक्क्याचे पाईपमध्ये ठेवण्यासाठी शेगडीमधून लोखंडी झारामधून स्टीलचे चिमटयाचे साहाय्याने हुक्का पॉटचे चिलीमवर ठेवत असताना मिळून आले. तसेच सदर हॉटेलमध्ये आग लागल्यास, आग विझवण्यासाठी कोणतीही अग्नीशामक यंत्रणा नव्हती. ग्राहकांना हुक्का ओढण्यासाठी ज्वालाग्रही पेटते निखारे पुरवताना धोका होवू शकतो, दुखापत होवू शकते व ज्वालाग्रही पेटते निखारे यांची ठिणगी पडून दुखापत होण्याची व आग लागून जीवीतहानी होण्याची शक्यता आहे. हे माहित असताना सुद्धा ज्वालाग्रही पेटते निखारे याचेबाबत हयगयी व बेदरकारपणे वर्तन करत असताना मिळून आले.

नमूद हॉटेल हे कस्तुरबा गांधी माध्यमिक शाळेपासून ५० फूट अंतरावर आहे. अशा परिस्थितीत उपरोक्त हॉटेलचे मालक व मॅनेजर यांनी आपले हॉटेलमध्ये बेदकारपणे व हयगयीने ग्राहकांना हुक्का ओढण्यासाठी फ्लेव्हर विक्री करून तंबाखूजन्य पदार्थ ठेवून ग्राहकांना हुक्का ओढण्यासाठी ज्वालाग्रही पेटते निखारे पुरवत असताना मिळून आले., म्हणून त्यांचेविरूद्ध कोरेगाव पार्क पो.स्टे.गु.र.नं.९२/२०१८, भा.दं.वि.क.२८५, ३४ व सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंधक व पुरवठा व वितरण) अधिनियम सन २००३ चे कलम ४,६,२१ प्रमाणे  गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर व मा.श्रीमती जयश्री गायकवाड, सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, निखील पवार, पो.उप-निरीक्षक, प्रकाश लंघे, सहा.पो.उप निरीक्षक, शादर कणसे सहा.पो.उप निरीक्षक व कर्मचारी रमजान शेख, सागर जगताप, अमोल जाधव, संदिप गायकवाड, सुनिल कुसाळकर, महादेव धांडे, गणेश हांडगर, योगेश शिवले यांनी केलेली आहे.